# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक २२३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०६ सप्टेंबर २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## राज्यातील ६ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज महाराष्ट्रातील ६ शिक्षकांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना राष्ट्रपतींनी शिक्षकांचे योगदानच भारताला सुपर पॉवर अर्थात महासत्ता बनवेल असे मत व्यक्त केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी येथील विज्ञान भवनात आयोजित एका शानदार कार्यक्रात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मान केला. प्रमाणपत्र, रौप्य पदक व रोख ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. महाराष्ट्रातील ६ शिक्षकांनाही हा पुरस्कार मिळाला. त्यात नांदेडच्या अर्धापूर येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन, मुंबई स्थित एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २ च्या शिक्षिका सोनिया विकास कपूर, लातूरच्या दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स महाविद्यालयाचे शिक्षक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे, मुंबई स्थित शाह अँड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. नीलाक्षी जैन, बारामतीच्या एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंगचे प्रा. पुरुषोत्तम पवार व संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूरच्या अनिल रामदास जिभकाटे यांचा समावेश आहे.

# राज्यभरात आज बाप्पाचे विसर्जन

## मुंबईत १८ हजार पोलीस, १० हजार कॅमेरे, ड्रोनद्वारे नजर अन् पहिल्यांदाचा एआयचा वापर

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रासह मुंबईत उद्या (६ सप्टेंबर) लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. दक्षिण मुंबईतील चौपाटीवर गणपती बाप्पाच्या विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक येत असतात. दरम्यान मुंबईतील गणपती विसर्जनासाठी मुंबई पोलीस सज्ज झाले आहेत. आज सह पोलीस आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आणि सह पोलीस आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे यांनी पत्रकार परिषद घेत गणपती विसर्जनाबाबत माहिती दिली. याबरोबरच राज्यभरातील गणरायाचे विसर्जन उद्या मिरवणुकीच्या तालात केले जाणार असून सर्व ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली. अतिसंवेदनशील शहरात पोलिसांच्या तगडा बंदोबस्त लावण्यात आल्याचे म्हटले जाते.

मुंबईमध्ये गणपती विसर्जनाच्या वेळी वाहतूक आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस सज्ज आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांची तैनात केली जाणार आहे. याशिवाय, सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन व इतर तंत्रज्ञानाचा वापर करून विसर्जन मिरवणुकींवर आणि गर्दीवर बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. सुरक्षेसाठी विशेष नाकेबंदी, नियंत्रण कक्ष आणि आपत्कालीन पथके तयार करण्यात आली आहे.

विसर्जनाची पूर्ण तयारी मुंबई पोलिसांनी केली आहे. रस्ते, चौपाटी, वाहतूकीची सगळी तयारी पूर्ण झालेली आहे. घरगुती गणेश विसर्जन, मंडळातील मोठ्या गणपती मूर्तीच्या विसर्जनाची तयारी पूर्ण झाली असून चौपाटीच्या ठिकाणी बीएसमी, स्वयंसेवक असतील. प्रत्येक ठिकाणी कडेकोट बंदोबस्ताचं नियोजन केलंय, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. मुंबईत १० हजार कॅमेरे लावण्यात आले आहेत. ड्रोनद्वारे देखील सगळ्या विसर्जनावर नजर ठेवण्यात येणार आहे. पोलिसांच्या पेट्रोलिंगच्या गाड्या असतील. कंट्रोल रुम देखील सज्ज आहे. पोलिसांनी दिलेल्या सगळ्या सूचनाचं पालन करा, असं आवाहन मुंबई पोलिसांकडून करण्यात आले आहे. तसेच यंदा पहिल्यांदाच मुंबई पोलिसांकडून बंदोबस्तात एआयचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती देखील मुंबई पोलिसांनी पत्रकार परिषदेत दिली.

गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. महापालिकेसोबत मिळून आम्ही बंदोबस्त आखला आहे. ६५०० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आहेत. दीड ते दोन लाख घरगुती गणपती मुंबईत आहेत. ६५ नैसर्गिक विसर्जन स्थळ आहे. २०५ कृत्रिम तलाव आहेत. तसेच विसर्जन मार्गावरील रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून मुंबईवर लक्ष ठेवलं जाईल.

१२ अतिरिक्त पोलीस आयुक्त, ४० डीसीपी, ६१ एसीपी यावेळी बंदोबस्तात तैनात असतील. सोबत ३००० अधिकारी आणि १८,००० पोलीस कर्मचारी देखील तैनात असतील. सोबत राज्य राखीव पोलीस दलाच्या १४ तुकड्या, चार शीघ्र कृती दलाच्या तुकड्या तीन दंगल नियंत्रण पथकाच्या तुकड्या, आणि बीडीडीएसला देखील सज्ज ठेवण्यात आले आहेत. १०००० सीसीटीव्ही कॅमेरातून विसर्जनावर लक्ष ठेवलं जाईल. तसेच ड्रोन कॅमेऱ्याने नजर ठेवली जाईल. एआयचा देखील मुंबई पोलीस बंदोबस्तकरीता वापर केला जाणार आहे. परवानगी शिवाय ड्रोन उडवण्यास बंदी असणार आहे. साध्या वेशातील पोलीस देखील तैनात असतील. दहशतवाद विरोधी उपाययोजना देखील घेण्यात आल्या आहेत

## मुंबईत पोलिसांना मानवी बॉम्बची धमकी मिळाल्याने खळबळ

### १४ पाकिस्तानी दहशतवादी घुसले, ४०० किलो आरडीएक्स असल्याचा केला दावा

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- गणेशोत्सवाच्या अंतिम टप्प्यावर असलेल्या अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर मुंबईला पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाची गंभीर धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. मुंबई वाहतूक पोलिसांच्या अधिकृत व्हॉट्सअॅप नंबरवर एक अज्ञात मेसेज पाठवण्यात आला असून, त्यामध्ये ३४ गाड्यांमध्ये मानवी बॉम्ब बसवण्यात आले असल्याचा दावा करण्यात आला आहे. गणेश विसर्जनाच्या एका दिवस अगोदर ही धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली असून पोलिस यंत्रणा अलर्ट मोडवर आल्याचे दिसून येते.

धमकीच्या संदेशात म्हटले आहे की, या बॉम्बस्फोटांमध्ये ४०० किलो आरडीएक्सचा वापर केला जाईल आणि त्यातून सुमारे १ कोटी लोकांचा मृत्यू होऊ शकतो. या धमकीनंतर मुंबई पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर असून, संपूर्ण शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

धमकीच्या मेसेजमध्ये 'लष्कर-ए-जिहादी' नावाच्या कथित दहशतवादी संघटनेचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच, भारतात १४ पाकिस्तानी दहशतवादी घुसल्याचाही दावा करण्यात आला असून, हे अतिरेकी मुंबईत मोठ्या प्रमाणावर स्फोट घडवून आणण्याच्या तयारीत असल्याचे भासवले आहे.

या प्रकाराची पोलीस मुख्यालय, अँटी टेरर स्क्वॉड, सायबर सेल आणि केंद्र सरकारच्या गुप्तचर यंत्रणांना माहिती देण्यात आली आहे. सध्या हा मेसेज नेमका कोणी केला याबाबत पोलिसांचा तपास सुरू असून, संपूर्ण शहरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी, गणपती विसर्जन मार्गांवर, रेल्वे स्थानकांवर आणि मॉल्समध्ये पोलीस बंदोबस्त अधिक कडक करण्यात आला आहे.

मुंबईला अशा प्रकारची धमकी येणे ही पहिली वेळ नाही. काही दिवसांपूर्वी वरळी येथील फोर सीझन हॉटेलमध्ये बॉम्ब असल्याचा फोन आला होता. त्याआधी, १४ ऑगस्ट रोजी एका ट्रेनमध्ये स्फोट होणार असल्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र, या सर्व प्रकरणांमध्ये तपासाअंती कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नव्हती. त्याचप्रमाणे, २६ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाला उडवण्याची धमकी देण्यात आली होती.

मुंबई पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. सार्वजनिक ठिकाणी संशयास्पद हालचाल किंवा वस्तू दिसल्यास तात्काळ १०० किंवा नजीकच्या पोलीस ठाण्याला माहिती द्यावी असे म्हटले आहे.

## शासनाचा निर्णय ओबीसी समाजावर दूरगामी परिणाम करणारा

### नाराज छगन भुजबळांचा उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा



मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या जारी करण्यात आलेल्या शासननिर्णयामुळे (जीआर) मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले जारी केले जातील आणि ओबीसींमध्ये मुक्तद्वार मिळणार असल्याचे प्रतिपादन अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी एका वर्तमानपत्राशी बोलताना केले. हा निर्णय ओबीसी समाजावर दूरगामी परिणाम करणारा असून हे सहन केले जाणार नाही. राज्य सरकारने नव्याने किंवा सुधारित शासननिर्णय जारी करुन सरसकट कुणबी दाखले देण्यास प्रतिबंध करावा, अन्यथा मुंबई उच्च न्यायालयात दाद मागावी लागेल, असा इशारा भुजबळ यांनी दिला.

त्या शासननिर्णयाबाबत भुजबळ यांची नाराजी कायम आहे. मला किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कायमस्वरुपी सत्तेचा ताम्रपट मिळालेला नाही. आम्ही काही वर्षांनी सत्तेत असू किंवा नसू, पण शासननिर्णय वर्षानुवर्षे लागू असतात. या शासननिर्णयामुळे ओबीसी समाजाचे नुकसान होण्याची भीती असल्याने माझा विरोध आहे. मी गप्प बसणार नाही. तो शासननिर्णय सरकारने मागे घ्यावा आणि कुणबी दाखले देण्यासंदर्भात (पान ४ वर)

## शरद पवारांनी जरांगे नावाचे भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवले-लक्ष्मण हाके



बारामती दि.५ (प्रतिनिधी)- सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्यासह राज्यातील मराठा आरक्षण आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्याने ओबीसी समाज नाराज झाला आहे. तसेच यावरुन ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. अशातच ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे देखील आक्रमक झाले आहेत. आज त्यानी बारामतीत ओबीसींचा मोर्चा काढत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. शरद पवार यांनी मनोज जरांगे पाटील यांना उभं केलं आहे. शरद पवार यांनी मनोज जरांगे नावाचं भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवल्याची टीका हाकेंनी केली.

दरम्यान, ज्यावेळी लक्ष्मण हाके यांचे भाषण सुरु होते, त्यावेळी त्यांना वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचा फोन आला. आंबेडकरांनी फोनवरुन उपस्थित जनतेशी संवाद साधला. जबरदस्ती दिलेलं आरक्षण आहे, आपल्याला रस्त्यावर उतरावं लागेल असे आंबेडकर म्हणाले.

लक्ष्मण हाके यांनी बारामतीत आज शरद पवार यांच्यासह अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. शरद पवार मतं आमची घेतात आणि जरांगेंना पाठिंबा देतात असेही हाके म्हणाले. मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला अस जर कोणी म्हटलं तर त्याचं कानफाड फोडा अशी टीका देखील हाके यांनी केली. देशभरात मंडल आयोग लागू झाला होता, फक्त महाराष्ट्रातच लागू झाला नव्हता. मंडल आयोगाची चळवळ शेकापचे दि बा पाटील, बबनरावजी ढाकणे, शिवाजीभाऊ शेंडगे, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, अरुण कांबळे, बाळासाहेब आंबेडकर या सगळ्या माणसांनी मंडल आयोग लागू केल्याचे हाके म्हणाले.

कुटुंबाच्या (पान ४ वर)

## छगन भुजबळ यांची भेट घेऊन समाधान करू-राधाकृष्ण विखे

अहिल्यानगर दि.५ (प्रतिनिधी)- मंत्री छगन भुजबळ हे ज्येष्ठ व प्रभावी नेते आहेत, त्यामुळे आपण त्यांची समक्ष भेट घेऊन मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाबाबत त्यांच्या आक्षेपांवर योग्य ते स्पष्टीकरण देऊन त्यांचे समाधान करू, असे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी सांगितले आहे.

मंत्री विखे आज शुक्रवारी नगरमध्ये माध्यमांशी बोलत होते. हैदराबाद गॅझेटिअरमध्ये अध्यादेशाबाबत स्पष्टीकरण नसल्यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणात घुसखोरी होणार असल्याचा आक्षेप मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थितीत केला. त्याकडे लक्ष वेधले असता मंत्री विखे यांनी भुजबळ यांची भेट घेणार असल्याचे सांगितले.

मध्यंतरीच्या काळात (पान ४ वर)

## महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांत शेती पिकाचे नुकसान; कृषी मंत्री भरणेंची माहिती

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात दरवर्षी अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होतं. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दि.१५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यात १४, लाख ३६ हजार २७६ हेक्टर क्षेत्र (३५ लाख ९० हजार ६०९ एकर) बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. बाधित भागातील सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीने देण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

## मुख्यमंत्री फार चतूर, चाणाक्ष; आरक्षणावरुन दोन्ही समाजाला खेळवण्याचे काम पद्धतशीरपणे केले-विजय वडेट्टीवार

सांगली दि.५ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत राज्य सरकारने जारी केलेल्या मराठा आरक्षणाच्या शासन निर्णयानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. ओबीसी नेते एकटवटले असून छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, हा सरसकट जीआर नसून केवळ पुराव्याचा आदेश आहे असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलंय. त्यावरुन, आता कॉंग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फार चतूर आहेत, फार चाणाक्ष आहेत. त्यांनी दोन्ही समाजाला खेळवण्याचे काम पद्धतशीरपणे केलंय. जो जीआर काढलाय त्याचा अर्थ काहीच लागत नाही. ओबीसींना काय दिलं हेच समजत नाही. एकाने मारल्यासारखं करायचं आणि दुसऱ्याने रडल्यासारखे करायचं. एकाने हसल्यासारखं करायचं आणि दुसऱ्याने अश्रू पुसल्यासारखं करायचं. अशा पद्धतीचं स्क्रिप्टेड काम सध्या राज्यात सुरू आहे. भविष्यात सगळ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याचे दिसून येईल, असे वडेट्टीवार यांनी म्हटले.

मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयावर शंका उपस्थित केल्या जात आहेत. तसेच, मुख्यमंत्र्यांनी दोन्ही समाजाला झुलवत ठेवलं असून सगळ्यांच्या तोंडाला पानं पुसल्याचं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाने काढलेल्या जीआरचा अर्थच कळत नाही. महायुतीचे सरकार हे बाबळीच्या झाडाला दगड मारतात आणि आंबे पडले म्हणून ओरडतात. त्यांच्याजवळ गेले की मात्र काटे रुततात, जे जे जवळ गेले त्यांना (पान ४ वर)

## पाश्चात्य देशांचे सैनिक युक्रेनच्या भूमीवर दिसले तर कायदेशीर लक्ष्य मानले जाणार-पुतीन

व्लादिवोस्तोक दि.५ (वृत्तसंस्था)- रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेनमध्ये पाश्चात्य सैन्य तैनात करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला असून, शुक्रवारी इशारा दिला की, अशा प्रकारच्या कोणत्याही सैन्याला 'कायदेशीर लक्ष्य' मानले जाईल. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा मॉस्कोमध्ये शांतता चर्चा आयोजित करण्याचा प्रस्ताव दिला आहे. व्लादिवोस्तोक येथील आर्थिक परिषदेत बोलताना पुतिन यांनी ठामपणे सांगितले की, 'जर कोणतेही सैन्य तेथे दिसले, विशेषतः आता लढाई दरम्यान, तर आम्ही या आधारावर पुढे जाऊ की ते कायदेशीर लक्ष्य आहेत.' युक्रेनमध्ये परदेशी सैन्याची तैनाती हा रशियाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी थेट धोका असल्याचे म्हणत, रशियाने सातत्याने युक्रेनमध्ये परदेशी सैन्य तैनात विरोध केला आहे. जर वाटाघाटींमुळे कायमस्वरूपी शांतता निर्माण झाली तर आंतरराष्ट्रीय सैन्य अनावश्यक ठरेल असा युक्तिवाद पुतिन यांनी केला. पुतिन म्हणाले 'जर शांततेकडे, दीर्घकालीन शांततेकडे नेणारे निर्णय घेतले गेले, तर मला युक्रेनच्या भूभागावर परदेशी सैन्याच्या उपस्थितीचा कोणताही अर्थ दिसत नाही. रशिया कोणत्याही कराराचे पूर्णपणे पालन करेल.'

## मराठ्यांना मराठा म्हणूनच आरक्षण देण्यात यावे, ओबीसीतून नको

### राजे मुधोजी भोसले यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नागपूर दि.५ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर ५ दिवस उपोषण केले. त्यांच्या या उपोषणाला यश आले व महायुती सरकारने आरक्षणाबाबतचा शासन निर्णय घेतला. त्यानुसार हैदराबाद गॅझेटची अंमल बजावणी करण्याचे सरकारने मान्य केले. आता यावर नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांनी प्रतिक्रिया देत म्हटले की मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण न देता मराठा म्हणून सरसकट स्वतंत्र आरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न देता मराठा म्हणून सरसकट आरक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे. याबाबत त्यांनी मागणीचे पत्र देखील देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांनी नुकतेच आंदोलन केले. यामध्ये मराठ्यांना (पान ४ वर)

## भारत व रशिया आपल्या हातातून चीनकडे निसटले; डोनाल्ड ट्रम्प यांचे निराश उद्गार

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- भरमसाठ टॅरिफ, रशियाकडून तेल खरेदी आणि व्यापार कराराच्या थांबलेल्या वाटाघाटींमुळे भारत आणि अमेरिकेत मोठा तणाव निर्माण झाला आहे. अशात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'असे दिसत आहे की, आपण भारत आणि रशियाला चीनला गमावल्यासारखे दिसते आहे.' यावेळी ट्रम्प यांनी तिन्ही देशांना उपरोधिकपणे 'समृद्ध' भविष्यासाठी शुभेच्छाही दिल्या. तसेच ट्रम्प यांनी पोस्टबरोबर मोदी, जीनपिंग आणि पुतिन यांचा एकत्रित फोटोही शेअर केला आहे.

या आठवड्याच्या सुवातीला चीनच्या तियानजिन येथे शांघाय सहकार्य संघटनेची शिखर परिषद झाली. यामध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी एक प्रकारे शक्तीप्रदर्शनच केल्याचे पाहायला मिळाले होते.

ट्रम्प यांची ही पोस्ट म्हणजे, गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घडामोडींमुळे भारत, रशिया आणि चीनमधील संबंध दृढ होत चालले आहेत, याची जाहीर कबुलीच आहे.

## हैदराबाद गॅझेटियर जीआर आणि सगळे व्यवस्थित आहे, मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळणार-मनोज जरांगे

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- कुणाच्या खोडीला कोणीही काही करु शकत नाही. जीआर आणि सगळे व्यवस्थित आहे. मराठवाड्यातील मराठा आरक्षणात जाणार असल्याने काहीही संभ्रम नसल्याचा पुनरुच्चार मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये उपचार घेत असलेल्या जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत विरोध करणाऱ्यांना सुनावले. आम्हाला माजमस्ती, सरकार, फडणवीस यांचा राग असला असता तर आमची निब्बर मूल बनियानवर होते समजून घ्यावं. आमची मुलं मुंबईला जिवंत करून गेले, असे जरांगे म्हणाले.

जीआरमधील त्रुटी मान्य आहे का अशी विचारणा केली असता त्यांनी त्रुटी असल्याचं त्यांनी मान्य केल. तसेच त्यामध्ये दुरुस्त करू, असे त्यांनी सांगितले. संजय राऊत यांच्या प्रतिक्रियेवर ते म्हणाले की, एवढी बार जाऊ द्या. हे आंदोलन गरीब मराठ्यांनी हाताळलं. दुसरं कुणीही हाताळला नाही. सध्या राऊत तिकडून लईच बोलायला लागले आहेत. उपोषण आम्ही कारायच आणि श्रेय यांना का द्यायचं, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही जीआर दुरुस्त करून सुधारित जीआर काढायला सांगितले आहे. प्रक्रिया कशी, टाईम बाँड काय? कधीपासून द्यायला सुरुवात करणार आहे. (पान ४ वर)

# निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या चिंताजनक

## आंतरराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिवस



आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिन, ज्याचा उद्देश गिधाडांच्या सर्व प्रजातींबद्दल जागरूकता निर्माण व्हावी व घटती संख्या या उद्देशाने २००९ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील बर्ड्स ऑफ प्रे कार्यक्रम आणि युनायटेड किंग्डममधील हॉक कंझव्हन्सी ट्रस्ट सहकार्याने सुरूवात करतात आली. तेव्हापासुन निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या पहाता जगात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या शनिवारला आंतरराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, अणुचाचणी, दारूगोळा,वाढती युद्धजन्य परिस्थितीत व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ-पुर्व-पश्चिम -उत्तर- दक्षिण-पृथ्वी-निसर्ग पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपली आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते.याचाच परिणाम आज मानव, पशुपक्षी, जीवजंतू यांना भोगावा लागत आहे.आज वाढत्या प्रदूषणामुळे पक्षांना आकाशात उडतांना अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो.

जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे आणि आता निसर्गाला संतुलित ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते निसर्ग मित्र गिधाड यांनाच आज मृत्यूशी सामना करावा लागत आहे याला अत्यंत भयावह परिस्थिती म्हणावी लागेल. मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे.त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावुन निसर्ग निरोगी ठेवुन पृथ्वीचे,मानवजातीचे व संपूर्ण जीवजंतूचे रक्षण गिधाड करायचे व करीत आहे.परंतु भारतासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील ९० टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे.गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम मानवजातीनेच केले आहे.भारतात ६ भारतीय व ३ स्थलांतरित अशा ९ प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे. १९८० च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या ४० दशलक्ष पेक्षा जास्त होती.मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या १५-२० वर्षात ९० टक्के गिधाडे संपली. काही प्रजातीतर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.जनावरांना दिली जाणारी डायक्लोफेनॅक औषध ही गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरायला लागली.त्यामुळे सरकारने २००६ मध्ये डायक्लोफेनॅक औषधीवर बंदी घातली.तरीही या औषधीचा वापर होत असल्याने २०१५ मध्ये भारत सरकारने त्यांच्या उत्पादनावर पुर्णतः बंदी घातली. डायक्लोफेनॅकवर बंदी लावली असली तरी इतर नॉन-स्टेरॉइडल एँटी-इंफ्लेमेटरी ड्रग्सचा वापर जनावरांवर केला जातो आणि या औषधीचाही वापर गिधाडांसाठी तेवढ्याच धोकादायक आहे.म्हणजेच आपण जनावरांना जेही काही औषधे देतो ती संपूर्ण गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरत आहे. त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे.२५-३० वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते. परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते.काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे.कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर विषेली होतात.ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते.यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या ९० टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.एका माहितीनुसार १९९३ ते २००७ दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढऱ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या ९९.९ टक्के नष्ट झाली आहे.याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची ९९ टक्के संख्या कमी झाली आहे. म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे.त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता; भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाची गरज आहे.२०२० ते २०२५ पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे मी स्वागत करतो.आंतराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिनाचे औचित्य साधून निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेच सोबतच संपूर्ण राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.

जंगल सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित,निसर्ग सुरक्षित तर पशुपक्षी सुरक्षित, पशुपक्षी सुरक्षित तर आपण सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# ज्येष्ठांनी घेतले मानाच्या गणपतींचे दर्शन



पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - येथील पिंपळे सौदागर परिसरातील लिनियर गार्डन जेष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांनी पुणे येथील विविध ठिकाणच्या श्री गणरायाचे सामूहिक दर्शन घेतले. पिंपळे सौदागर येथील नाशिक फाटा मेट्रोने गणरायाच्या जयजयकार करीत सर्व ज्येष्ठ नागरिक गणेश भक्तांनी प्रवास केला. कसबा येथील मानाच्या गणपती पासून प्रारंभ करण्यात आलेल्या या भक्ती यात्रेत दगडूशेठ हलवाई गणपती, मंडई गणपती, जोगेश्वरी तसेच सर्व मानाच्या गणपतींचे ज्येष्ठांनी दर्शन घेतले. दर्शनानंतर सर्वांनी सामुहिक भोजनाचा आनंद घेतला.

संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांनी आयोजित केलेल्या या श्री गणेश दर्शन कार्यक्रात पांडुरंग कांबळे, हरिमोहन तिवारी, सी. व्ही. ब्राह्मणकर, विलासराव अहिराव, सुभाष भदाणे, सुधाकर देसले, सुधाकर पाटील, शरदकांत नेरकर, श्रीकृष्ण तायडे, बसवराज, शशिकांत पाथरकर, राजेंद्र महाजन, सोनवणे, पाहालज आणि इतर ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

# 'संपूर्णा' मालिकेतील संदीप्ता सेनसाठी झीनत अमान यांच्याशी झालेली भेट ठरली अविस्मरणीय, शेअर केल्या खास भावना



स्टार प्लस नेहमीच आपल्या ताकदीच्या आणि भावनिक कथा सांगणाऱ्या मालिकांसाठी ओळखला जातो. आता हा वाहिनी प्रेक्षकांसाठी एक नवीन आणि रंजक मालिका 'संपूर्णा' घेऊन येत आहे. ही एक काल्पनिक कथा असलेली नाट्यमालिका आहे, ज्याचा ट्रेलर बॉलीवूड अभिनेता सोनू सूद यांनी खास लाँच केला आहे.

या मालिकेत 'मिट्टी' ही प्रमुख भूमिका साकारणारी अभिनेत्री संदीप्ता सेन हिने तिच्या आगामी मालिकेच्या खास भागाचा अनुभव शेअर करताना सांगितले की, तिला ज्यावेळी दिग्गज अभिनेत्री झीनत अमान यांच्यासोबत संवाद साधण्याची संधी मिळाली, ते क्षण तिच्यासाठी खूपच खास ठरले.

संदीप्ता म्हणाली, झीनत अमान जींना भेटून मी खूप भावूक झाले. त्या इतक्या मोठ्या स्टार असूनही, त्यांनी माझ्याशी अगदी आपुलकीने संवाद साधला. त्यांनी केवळ त्यांच्या अनुभवांविषयी सांगितले नाही, तर मला खास टिप्स आणि मार्गदर्शनही दिलं. जेव्हा कोणीतरी अशा प्रकारे उबदारपणे आणि समजूतदारपणे आपल्याला काही शिकवतो, ते क्षण कायमचे आठवणीत राहतात. मला वाटतं मी भाग्यवान आहे की मला त्यांच्याकडून शिकण्याची संधी मिळाली. त्यांच्या शब्दांनी मला नेहमी जमिनीशी जोडून ठेवण्याची आणि स्वतःला पुढे नेण्याची प्रेरणा दिली आहे.

'संपूर्णा' या मालिकेच्या नुकत्याच प्रदर्शित ट्रेलरमध्ये 'मिट्टी' नावाच्या एका महिलेचं आयुष्य उलगडताना दिसतं. सात वर्षांपासून सुखाने संसार करणारी पत्नी आणि चार वर्षांच्या मुलाची आई असलेली मिट्टीचं आयुष्य एकदम परिपूर्ण वाटतं. मात्र, आयुष्यात सगळं तसं नसतं, हे तिला तेव्हाच कळतं, जेव्हा एका बातमीतून तिला समजतं की तिचा पती डॉ. आकाश एका प्रकरणात अटक झालाय. डॉ. आकाश स्वतःला निरपराध सांगतो आणि त्याला या प्रकरणात फसवलं गेलंय, असंही सांगतो.

कथेत नंतर 'नैन' नावाची एक बेधडक, एकटी राहत असलेली मुलगी समोर येते, जिला प्रेमाची आस आहे. तिच्या पात्रामुळे या कथानकात नवे वळण येतात. मग प्रश्न उभा राहतो की, एका प्रतिष्ठित डॉक्टरवर इतका गंभीर आरोप का करण्यात आलाय? आणि या आरोपामागे दडलेली कोणती सत्यं उघडकीस येणार आहेत? हे जाणून घेणं नक्कीच रंजक ठरेल.

पाहा नवी मालिका 'संपूर्णा', ८ सप्टेंबरपासून, दररोज संध्याकाळी ७:३० वाजता, फक्त स्टार प्लसवर.

# संत मदर तेरेसा: एक भारतीय रोमन कॅथॉलिक नन!



**मदर तेरेसा यांचे देहावसान दि.५ सप्टेंबर १९९७ साली झाला. त्यांच्या मृत्यूनंतर संतपद देण्यासाठी २००३ साली पहिला चमत्कार झाल्याचा दावा करण्यात आला. मोनिका बसेरा नावाच्या पश्चिम बंगाल येथील तरुणीच्या पोटातील कर्करोगाची गाठ मदर तेरेसांच्या फोटोमधून दिव्य शक्ती मिळाल्यामुळे बरी झाल्याचा हा दावा होता. आता विज्ञानाच्या कसोटीवर विचार करायचे ठरवले, तर एखादी व्यक्ती मृत्यूनंतर देखील इतर लोकांच्या जीवनावर प्रभाव टाकू शकते, हीच गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाही. थोडे पुढे जाऊन या दाव्यातील वास्तव समजून घेतले, तर अनेक गोष्टी लक्षात येतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर महत्त्वपूर्ण लेख वाचा...**

**मदर** तेरेसा धाडसी होत्या. बैरूतला वेढा पडलेला असताना त्यांनी इ.स.१९८२मध्ये पॅलेस्टेनियन बंडखोर व इस्रायली सैनिक यांच्यात तात्पुरता समझोता घडवून आणून रेडक्रॉसच्या मदतीने ३७ लहान मुलांची सुटका घडवून आणली. त्या स्वतः युद्धभूमीवर हिंडल्या. पूर्व युरोप ज्यावेळी अधिक मोकळा व्हायला लागला होता, त्यावेळी त्यांनी कम्युनिस्ट देशांमध्ये मिशनरीज ऑफ चॅरिटीचा प्रसार केला. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्या आजीवन झटत होत्या, त्या खरोखरच शांतिदूत होत्या. इथिओपियामधल्या भुकेलेल्यांना त्यांनी आधार दिला. त्या तिथे गेल्या. ज्या काळात चेर्नोबिलच्या किरणोत्सर्गाची घटना घडली, तेव्हाही आपल्याला त्याचा त्रास होईल किंवा नाही याची चिंता करत बसण्यापेक्षा त्या तिथे गेल्या. ज्यांना तो त्रास झाला त्यांना आधार दिला. मदर तेरेसा यांनी संतपदाची कसोटी असलेली दुसऱ्या चमत्काराची अट पूर्ण केली. त्यांना संतपद देण्याचा सोहळा डिसेंबर २०१५मध्ये झाला. ही उपाधी दि.९ सप्टेंबर २०१६ला लालवेटिकन सिटीमध्ये पोप फ्रांसिसने मदर तेरेसा यांना बहाल केली.

मदर तेरेसा यांचे जन्मनाव ऑग्नीसा गाँकशा वाजक्शियू असे होते. त्यांचा जन्म दि.२६ ऑगस्ट १९१० रोजी अल्बानिया येथे झाला. या भारतरत्न आणि नोबेल शांतता पुरस्कार सन्मानित एक भारतीय रोमन कॅथॉलिक नन होत्या. नवीन चावला हे मदर तेरेसा यांचे अधिकृत चरित्रकार होते. त्या भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी अनेकांना तसा बाप्तिस्मा दिला; अशा असंख्य वार्ता त्या काळात उठत राहिल्या, पण त्या सगळ्या तथ्यहीन होत्या. त्या एकदा अशाच टीकेला त्रासून म्हणाल्या, की होय, आपण त्यांचे धर्मांतर घडवते. हिंदूंना अधिक चांगले हिंदू बना, मुस्लिमांना अधिक चांगले मुस्लिम व्हा, तर ख्रिश्चनांकडे अधिक चांगले ख्रिश्चन बना असा आग्रह धरते. इ.स.१९७९मध्ये त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला तेव्हा आणि इ.स.१९८०मध्ये त्यांना भारतरत्न किताब देण्यात आला, तेव्हाही त्या म्हणाल्या, की त्यांना दिव्यांच्या लखलखाटात जायला अजिबात आवडत नाही.

**मदर तेरेसा यांचे देहावसान**

दि.५ सप्टेंबर १९९७ साली झाला. त्यांच्या मृत्यूनंतर संतपद देण्यासाठी २००३ साली पहिला चमत्कार झाल्याचा दावा करण्यात आला. मोनिका बसेरा नावाच्या पश्चिम बंगाल येथील तरुणीच्या पोटातील कर्करोगाची गाठ मदर तेरेसांच्या फोटोमधून दिव्य शक्ती मिळाल्यामुळे बरी झाल्याचा हा दावा होता. आता विज्ञानाच्या कसोटीवर विचार करायचे ठरवले, तर एखादी व्यक्ती मृत्यूनंतर देखील इतर लोकांच्या जीवनावर प्रभाव टाकू शकते, हीच गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाही. थोडे पुढे जाऊन या दाव्यातील वास्तव समजून घेतले, तर अनेक गोष्टी लक्षात येतात. प्रत्यक्षात कुठलेही साक्षी पुरावे न देता हा दावा करण्यात आला होता. चौकशीमध्ये पुढे हे देखील समोर आले होते, की प्रत्यक्षात त्यांना क्षयरोगाचा उपचार चालू होता. त्यांच्या पोटातील गाठ देखील क्षयरोगातून झालेली होती आणि क्षयरोगाच्या उपचारांनी ती गाठ बरी झाली होती. त्यावेळी डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महा.अंनिसने या चमत्काराच्या दाव्याला विरोध केला होता. वास्तव समाजापुढे ठेवले होते. त्यानंतरही त्याच पद्धतीने २००८मध्ये केवळ मदर तेरेसा यांचे नाव घेऊन प्रार्थना केल्यामुळे ब्राझीलमधील एका व्यक्तीच्या मेंदूतील गाठी बऱ्या झाल्याचा चमत्कार घडल्याचा दावा केला जात आहे. ही व्यक्ती कोण आहे? त्याला नक्की कोणता आजार होता? प्रार्थनेमुळेच हा आजार बरा झाला, हे कशावरून सिद्ध होते? यांपैकी कोणत्याही प्रश्नांचे समाधानकारक उत्तर न देता केवळ चमत्कार झाला, असे सांगणे हे विज्ञानाच्या प्राथमिक कसोट्यांवर देखील उतरत नाही. आता मात्र या चिकित्सेवर पडदा पडला की काय? याबद्दल काहीही कळत नाही. त्यांना दि.१७ डिसेंबर २०१५ पोप फ्रान्सिस यांनी संत घोषित केले. पंधरा भारतीय अधिकरी व हजार एक अन्य लोक दि.५ सप्टेंबर २०१६ रोजी सेंट पीटर स्वेअरमध्ये संतपणाच्या मिसबलिदानात सामील झाले होते. सन २०१२मध्ये झालेल्या आऊटलुक इंडियाच्या द ग्रेटेस्ट इंडियन या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये मदर तेरेसा पाचव्या क्रमांकावर होत्या. शांतिदूत मदर तेरेसा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

- संकलन व सुलेखन -

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

गडचिरोली, मो. ७७७५०४१०८६.

# डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता.अलिबाग तर्फे ६ सप्टेंबर २०२५ शनिवारी निर्माल्य संकलन

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र भूषण, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता. अलिबागतर्फे शनिवार, ६ सप्टेंबर रोजी निर्माल्य संकलन आयोजित केले आहे. छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात सकाळी ९:०० वाजेपासून रात्री १०:०० पर्यंत हे अभियान राबविले जाणार आहे. नदी नाल्यात, सरोवरात, किंवा गावाजवलील निर्माल्य टाकू नये, यासाठी जनमानसांत स्वच्छतेविषयी जागृती करणे, प्रतिष्ठानकडून दरवर्षी गणेशउत्सव, नवरात्र, श्री रामनवमी उत्सव, निर्माल्य संकलन मोहिमा राबवल्या जातात, यात हजारो स्वयंसेवक सहभागी होतात आणि गोळा केलेल्या निर्माल्यातून खत निर्मिती केली जाते. खालील ठिकाणी निर्माल्य संकलन होणार. शिवाजीनगर परिसर, हडको छ.१२, बजाजनगर परिसर आणि छावणी परिसर.

# शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र लिमिटेडचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी उघडणार, किंमतपट्टा १५५ रु. ते १६५ रु. प्रति इक्विटी शेअर असा निश्चित

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १० रु. दर्शनीमूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १५५ रु. ते १६५ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ९० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ९० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

हा आयपीओ पूर्णपणे २,४३,००,००० इक्विटी शेअर्सपर्यंतच्या शेअर्सचा एक नवीन इश्यू आहे ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही.

२००९ मध्ये स्थापन झालेले, शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र अमेरिकन हिरे, क्यूबिक झिरकोनिया, मोती, मोतीची आई आणि अर्ध-मौल्यवान दगड अशा विविध 'स्टोन'नी सजवलेल्या मंगळसूत्रांच्या डिझाइन, उत्पादन आणि विपणनात गुंतलेले आहे, जे १८ कॅरेट आणि २२ कॅरेट सोन्यापासून बनवले जातात. कंपनी प्रामुख्याने तिच्या बिझनेस-टू-बिझनेस (इ२इ) क्लायंटना सेवा देते आणि कॅलेंडर वर्ष २३ पर्यंत भारतातील संघटित मंगळसूत्र बाजारपेठेचा अंदाजे ६ टक्के हिस्सा धारण करते, असे केअरएज अहवालात म्हटले आहे.

शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र भारतातील २४ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधील कॉर्पोरेट क्लायंट, घाऊक ज्वेलर्स आणि किरकोळ विक्रेत्यांसह विस्तृत श्रेणीतील ग्राहकांना सेवा देते. देशांतर्गत बाजारपेठेव्यतिरिक्त कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली उपस्थिती वाढवली आहे, यूके, न्यूझीलंड, यूएई, यूएसए आणि फिजी प्रजासत्ताकमधील ग्राहकांना सेवा देत आहे.

कंपनीच्या प्रमुख कॉर्पोरेट क्लायंटमध्ये मालाबार गोल्ड लिमिटेड, टायटन कंपनी लिमिटेड, जीआरटी ज्वेलर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, रिलायन्स रिटेल लिमिटेड, नोव्हेल ज्वेल्स लिमिटेड (आदित्य बिर्ला ग्रुप), जॉयलुक्कास इंडिया लिमिटेड आणि गोल्डबॉक्स एंटरप्रायझेस लिमिटेड (यूके), सोना संसार लिमिटेड (न्यूझीलंड) आणि दमास ज्वेलरी एलएलसी (यूएई) सारख्या आंतरराष्ट्रीय




नावांचा समावेश आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत, कंपनीने ३४ कॉर्पोरेट क्लायंट, १,०८९ घाऊक विक्रेते आणि ८१ किरकोळ विक्रेते यांना सेवा दिली.

कंपनीच्या मुख्य व्यवसायाव्यतिरिक्त शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र त्यांच्या कॉर्पोरेट क्लायंटना जॉब-वर्क आधारावर मंगळसूत्रांचे उत्पादन आणि पुरवठा देखील करते. २०२५, २०२४ आणि २०२३ या आर्थिक वर्षात कंपनीने एकूण १,३२०.७२ किलो, १,२२१.१९ किलो आणि ८७०.२६ किलो सोने मंगळसूत्रांमध्ये प्रक्रिया केले.

कंपनीकडे मंगळसूत्रांचा विस्तृत पोर्टफोलिओ आहे, ज्यामध्ये १५ हून अधिक संग्रह आणि १०,००० हून अधिक सक्रिय 'एसकेयू' आहेत, जे लग्न, सण आणि वर्धापनदिनासारख्या विशेष प्रसंगी तसेच दररोजच्या पोशाखांसाठी डिझाइन देतात.

कंपनीच्या संग्रहात अँटीक, ब्राइडल, पारंपारिक, समकालीन आणि इंडो-वेस्टर्न शैलींचा समावेश आहे, जे सर्व वयोगटातील महिलांना वेगवेगळ्या किंमती आणि वजनांसह सेवा देतात.

श्रृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्रने ३० जून २०२५ पर्यंत २२ पूर्णवेळ कर्मचाऱ्यांची एक समर्पित इन-हाऊस डिझाइन टीम नियुक्त केली होती, जी नवीनतम ट्रेंड, ग्राहकांच्या पसंती आणि लोकसंख्याशास्त्रीय गरजा प्रतिबिंबित करणाऱ्या नाविन्यपूर्ण डिझाइन तयार करण्यावर लक्ष केंद्रित करते.

याव्यतिरिक्त, कंपनी १६६ इन-हाऊस कारीगर (कारागीर) सोबत काम करते आणि तिच्या उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तृतीय-पक्ष कारीगरांच्या नेटवर्कशी सहयोग करते. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय मुंबईच्या काळबादेवी रोड येथे आहे आणि उत्पादन सुविधा लोअर परळ (पश्चिम), मुंबई येथे आहे.

शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्रचा काम काजातून मिळणारा महसूल आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १,१०१.५२ कोटींवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १,४२९.८१ कोटींपर्यंत वाढला. करपश्चात नफा आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ३१.१० कोटींवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ६१.११ कोटींपर्यंत वाढला.

इश्यूसाठी चॉइस कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड ही एकमेव बुक-रनिंग लीड मॅनेजर आहे आणि एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही इश्यूची रजिस्ट्रार आहे.

हा इश्यू बुक-बिल्डिंग प्रक्रियेद्वारे केला जात आहे, ज्यामध्ये निव्वळ इश्यूच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाटप पात्र संस्थात्मक खरेदीदारांना प्रमाणानुसार उपलब्ध असेल, निव्वळ इश्यूच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील तर बिगर-संस्थात्मक बोलीदारांना वाटपासाठी उपलब्ध असेल आणि किरकोळ वैयक्तिक बोलीदारांना निव्वळ इश्यूच्या ३५ टक्क्यांपेक्षा कमी वाटपासाठी नसतील.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

